आरबीआय/२०११-१२/९५
सीजीबीए. सीडीडी. क्र. एच - ९०२०/१३.०१.२९९/२०११-१२

जुलै ०१,२०११
आषाढ १०,१९३३ (एस)

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
भारतीय स्टेट बँक व सहकारी बँका
१७ राष्ट्रीयीकृत बँका
ॲक्सिस बँक लि./आयसीआयसीआय बँक लि./आयडीबीआय बँक/एचडीएफसी बँक लि./स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

महोदय/महोदया,

**ब्रोकर्सची नेमणूक व यादीतून काढून टाकणे आणि रिलीफ/बचत रोख्यांचे प्रदान ह्यावरील महापरिपत्रक**

कृपया "ब्रोकर्सची नेमणूक व यादीतून काढून टाकणे आणि रिलीफ/बचत रोख्यांचे प्रदान ह्यावरील महापरिपत्रक" ह्यावरील महापरिपत्रक क्र. आरबीआय/२०११-१२/३६ दि जुलै १, २०११चा संदर्भ घ्यावा

२) वरील विषयावरील सर्व कार्यकारी सूचना एजन्सी बँकांना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, ३०.६.२०११ पर्यंत अद्यावत केलेले महापरिपत्रक सोबत जोडले आहे. हे परिपत्रक आपण आमच्या http://www.rbi.org.in ह्या वेबसाईटवर पाहू शकाल.

कृपया पोच द्यावी.

आपला (एस. के. बाल)
महाव्यवस्थापक

---

हा विभाग आयएसओ ९००१-२००० प्रमाणित आहे
डिपार्टमेंट ऑफ गव्हर्मेंट अँड बँक अकाउंट्स, केंद्रीय कार्यालय, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा मुंबई-४०००००८,
टेलि-(०२२) २३०८४१२१; फॅक्स क्र. (०२२) २३०१००९५
ईमेल : cgmicdgbaco@rbi.org.in

**महापरिपत्रक**
**रिलिफ/बचत रोखे**

## अ) ब्रोकर्सची नेमणुक/यादीतून काढून टाकणे

### १) ब्रोकर्सच्या नावनोंदणी/पंजीकरणाची कार्यरीत

ब्रोकर्सची नोंदणी/पंजीकरण करण्यासाठी एजन्सी बँका एक आधी कार्यरीत अंगीकारु शकतात. नोंदणी/पंजीकरण करण्यास इच्छुक असलेल्या ब्रोकरने त्याची/तिची नोंदणी/पंजीकरणाची विनंती, त्याच्या/तिच्या व्यावसायिक लेटरहेडवर, त्याच्या व्यवसायिक माहितीसह सादर करावी. एजन्सी बँकांनी एक ब्रोकर कोड नंबर द्यावा आणि रिसीव्हींग ऑफिसेसमध्ये सादर करावयाच्या सर्व अर्जांवर ब्रोकरने त्याचा निर्देश करावा.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी.१३.०१.२०१/६९२/२०००-०१ दि, ९.८.२०००.)**

### २) एजन्सी बँकांद्वारे उप-एजंटांची नेमणुक

आमच्या नजरेस असे आले आहे की, आरबीआयकडून नेमलेल्या/प्राधिकृत केलेल्या काही बँकांनी, अर्ज स्वीकारण्यासाठी इतर बँकांची ब्रोकर्स/एजंट्स म्हणून नेमणुक केली असून ते ब्रोकर/एजंट्स, त्यांच्या प्रसिध्दी. साहित्यामध्ये आणि बिल बोर्डांवर रिझर्व बँकेचे नावाचा उपयोग करुन, रिलिफ/बचत रोख्यांच्या व्यवसारासाठी रिझर्व बँकेने त्यांना नेमले आहे असे त्यावर दाखवीत आहेत. येथे आम्ही स्पष्ट करीत आहोत की, जेथे प्राधिकृत बँकांनी ब्रोकर किंवा एजंट म्हणून इतर बँका/संस्थांच्या सेवा घेतल्या आहेत तेथे, त्यांची नेमणूक करणाऱ्या एजन्सी बँका ह्याच त्या एजंट/ब्रोकर्सच्या कार्यकृतींबाबत जबाबदार राहतील अशा कोणत्याही बँकेने आरबीआयचे नाव वापरले जाऊ नये.

**(संदर्भ. क्र.सीओ.डीटी.१३.०१..२५१.५३४१/२००१-०२ दि. ४-१-२००२)**

### ३) ब्रोकर्सना यादीतून काढून टाकणे

एजन्सी बँकांना सांगण्यात येते की, दोन वर्षे पर्यंत काहीही कामगिरी न करणाऱ्या ब्रोकर्सना त्यांच्याकडून नवीन धंदा न मिळाल्यास एक नोटिस देऊन त्यांचे नाव यादीतून काढून टाकण्यात यावे.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी.१३.०१.२०१/४८९०/२०००-०१ दि, ९.८.२०००.)**

## ब) बचत रोख्यांसाठी प्रदान व दलालीचे दर

### १) दलालीचे दर

एजन्सी बँकांकडे नोंदणी/पंजीकरण केलेल्या ब्रोकर्सना, फॉर्म बीएलमध्ये, नेमलेल्या शाखांमध्ये, त्यांच्या ग्राहकांच्या वतीने गुंतवणुकीसाठी त्यांचा शिक्का असलेले अर्ज सादर केले जाण्यावर १.०० (रुपया एक) प्रति रु १००/- ह्या दराने दलाली देण्यात यावी. **(संदर्भ क्र. सीओ.डीटी. १३.०१.२०१/४३२/ २०००-०१ दि,२५-७-२०००)**

तो ब्रोकर्स गुंतवणुकदार/अर्जदार ह्यांचेपैकी एक असल्यास दलाली दिली जाऊ नये
**(संदर्भ क्र. सीओ.डीटी. १३.०१.२९८/एच २४११/०३-०४ दि. २९-१०-२००३)**

### २) दलाली प्रदानावर टीडीएस नाही -

एजन्सी बँकांनी नोंद घ्यावी की, ब्रोकर्सनी प्रसिध्दी/प्रचार केलेल्या बचत रोखे व्यवसायाच्या बाबतीत, ब्रोकरेजचे प्रदान करताना आयकर अधिनियम, १९८१ च्या कलम १९४ (एच) अन्वये, त्यावर टीडीएस कापला जाऊ नये.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी. २०१/५९००/२०००-०१ दि. २८-५-२००१ आणि सीओ.डीटी. १३.०१.२९८/एच-३६६०/०३-०४ दि.३-१-०४)**

### ३) दलालीसंबंधीचे दावे

१) दलालीसंबंधीचे दावे तातडीने व कोणत्याही बाबतीत सबस्क्रिप्शनच्या तारखेच्या ३० दिवसांच्या आत सोडविण्यासाठी एजन्सी बँकांना सांगण्यात येत आहे.
२) एजन्सी बँकांना सांगण्यात येत आहे की त्यांनी दलालीबाबतचे दावे आधी सोडवावेत व त्यानंतर रिझर्व बँकेकडून भरपाई मागावी.
**(संदर्भ क्र. सीओ.डीटी./१३.०१.२०१/४६६८/२०००-०१ दि८-३-२००१)**

३) ग्राहक सेवा सुधारण्याचा एक उपाय म्हणून, एजन्सी बँकांनी, एजंटांकडून तसे मँडेट घेऊन, त्यांना द्यावयाची दलाली, दरमहा, ईसीएसद्वारा त्यांच्या खात्यात जमा करण्याची व्यवस्था करावी.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी.१३.०१.२९८/ एच -४६७७/२००२-०३ दि. २३-५-२००३)**

४) १.७.२००२ पासून बचत रोख्यांच्या बाबतीत असलेल्या दलालीबाबतच्या दाव्यांची प्रतिपूर्ती करणे सीएएस नागपूर येथे केंद्रीकृत करण्यात आले आहे. आणि ठरविण्यात आले आहे की, व्यवसायाच्या महिन्याच्या अखेरीस, सीएएसला कळविलेल्या/पाठविलेल्या/प्रेषण केलेल्या निधीच्या आधारावर, एजन्सी बँकांना देय असलेल्या दलालीच्या ९०% रक्कम, पुढील महिन्याच्या तिसऱ्या कामकाजाच्या दिवशी प्रदान केली जाईल. आणि उरलेली १०% रक्कम जोडपत्रे ४ मधील विवरणपत्र सादर केल्यावर प्रदान केली जाईल. **(संदर्भ -सीओ.डीटी.१३.०१.२७२/११०३२/२००१-०२ दि.२५.६.२००२ आणि सीओ.डीटी.१३.०१.२७२.एच २९०६ दि २६.२.२००३)**

(काही विशिष्ट बाबींवर सविस्तार स्पष्टीकरण पाहिजे असल्यास कृपया वर निर्दिष्ट केलेल्या परिपत्रकांचा घ्यावा.)